## - जाहीर नोटीस -

**वाचा.1.**शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संकीर्ण 03/2015/प्र.क्र.24/अ-2 दिनांक 12/05/2015.

**2.**महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.एक्यूएन/01/2017/प्र.क्र.12/भाग/अ-मंत्रालय मुंबई - 4000032 दिनांक - 25/01/2017

---

**क्र.भूसंपादन/एसआर02/2024**

**दिनांक 21/01 /2025**

ज्याअर्थी,**कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग सांगली** यांनी टेंभू उपसा सिंचन प्रकल्प **माण खटाव उपसा सिंचन योजनेअंतर्गत पंपगृह व अनुषंगिक बाबी मौजे वेजेगांव ता.खानापूर जिल्हा-सांगली** या प्रयोजनाकरीता वरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतुदी अंतर्गत कार्यपध्दतीव्दारे खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने **मा.कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग विभाग सांगली** यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र जा.क्र./लपावि/भूसं/2022/2024 दिनांक 04/10/2024 नुसार मौजे वेजेगांव ता.खानापूर जि.सांगली येथील गट क्र.150 मधील आवश्यक क्षेत्रफळ 0.40 हे. आर चा प्रस्ताव जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील आदेश क्र.भूसं/आरआर-922/2024दि. 15/10/2024 अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी वरील वाचले मध्ये नमूद शासन निर्णय तसेच शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती सांगली याव्दारे, प्रस्तावित खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग विभाग सांगली यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

प्रकल्पासाठी जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणे कामी जमिनीच्या मोबदल्याचा दर ठरविण्यासाठी गठित जिल्हास्तरीय समिती मार्फत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 मधील कलम 26 ते 30 च्या तरतुदीनुसार, तसेच सदर अधिनियमाच्या शेडयुल 1 च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर 25 टक्के रक्कम वाढीव देऊन खरेदीची रक्कम निश्चित करण्यात येईल.

**याबाबतीत**

1. हितसंबंधित भूधारकांनी त्यांच्या हरकती असल्यास त्या कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग विभाग सांगली यांचे कार्यालयाकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पंधरा (15) दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत दाखल कराव्यात.

2. खाजगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घ्यावयाच्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपअधीक्षक भूमि अभिलेख विटा ता.खानापूर जिल्हा-सांगली यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना व हितसंबंधित व्यक्तींना निरीक्षणासाठी उपलब्ध आहे.



Scanned with OKEN Scanner

खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दती प्रकरण/एसआर क्र.02/2024 मौजे वेजेगांव ता.खानापूर जिल्हा-सांगली टेंभू उपसा सिंचन प्रकल्प माण खटाव उपसा सिंचन योजनेअंतर्गत पंपगृह व अनुषंगिक बाबी चे कामाकरीता खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने खरेदी करावयाच्या

खाजगी जमिनीचा तपशील :

| अ.क्र | भूधारकांचे नाव | ग.नं | भूधारणा पद्धती | गा.न.नं 7/12 प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीरंग दाजी देवकर,<br>चंद्रकांत श्रीरंग देवकर,<br>प्रवीण श्रीरंग देवकर,<br>कार्यकारी अभियंता टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.1 सांगली, | 150 | वर्ग 1 | 8.31<br>पो ख 0.41<br>एकूण 8.72 | 0.40 |
| | | | | एकूण क्षेत्र | 0.40 |

**ठिकाण - सांगली**
**दिनांक - 21 /01/2025**

(ॲड.पी.जी.देशमुख)
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पॅनल वकील**

(म.म.रासनकर)
**कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग सांगली**

(वसुंधरा बारवे)
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय समिती, सांगली**



Scanned with OKEN Scanner